ZEAL EDUCATION SOCIETY'S

# ZEAL POLYTECHNIC, PUNE

| Doc. No.: ZEAL/POLY/ADMIN/SOP-22/F-20 | Rev. No.: **00** | Rev. Date:**01.09.2023** |
|---|---|---|

Ref No:- ZP/25-26/164 Date:- 26/09/2025

## नोटीस

**Department:** Administration **Academic Year:** 2025 - 2026 **Date: 26/09/2025**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या सर्व शाखांतील विद्यार्थ्यांना सूचना देण्यात येत आहे की :

### 1. शिष्यवृत्ती अर्ज (Scholarship Form):

ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत महाडीबीटी वेब पोर्टल **(https://mahadbt.maharashtra.gov.in)** वर संपूर्ण आवश्यक कागदपत्रे **(Documents)** अपलोड करून शिष्यवृत्तीचा ऑनलाईन अर्ज सादर केलेला नाही, त्यांनी आपल्या विभागातील Stake Holder Committee Member (SRC) यांच्याशी संपर्क साधून दिनांक १५/१०/२०२५ पर्यंत महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून हा अर्ज पूर्ण करणे अत्यावश्यक आहे.

निर्धारित मुदतीत संपूर्ण कागदपत्रांसह अर्ज न केल्यास शिष्यवृत्ती योजनेचा लाभ गमावला असे समजून अशा विद्यार्थ्यांना संपूर्ण शैक्षणिक शुल्क (Fee) खुल्या प्रवर्गाप्रमाणे Winter 2025 MSBTE Examination चे हॉल तिकीट वितरित होण्यापूर्वी शुल्काची संपूर्ण रक्कम जमा करावी लागेल, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

यापूर्वी अनेक वेळा स्मरणपत्रे (Reminders) दिल्यानंतरही ज्यांनी अर्ज व कागदपत्रे सादर केलेली नाहीत त्यांच्या कारणांना पुढे मान्यता दिली जाणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

### 2. शैक्षणिक शुल्क (Fee)-:

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चालू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी आपल्याला लागू असणारी संपूर्ण फी भरून या शैक्षणिक वर्षात प्रवेश घ्यावा अशी नोटीस वर्ष चालू होण्यापूर्वी दिलेली होती. तरी परंतु विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या आर्थिक अडचणीपोटी टप्याटप्याने शुल्क भरण्याची मुदत पूर्वी जाहीर करण्यात आली होती. त्याचबरोबर परीक्षा फॉर्म भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी स्वतःला लागू असणारी फी भरण्याबाबतही स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या.

तरीदेखील काही विद्यार्थ्यांनी अद्याप संपूर्ण शुल्क भरलेले नाही. अशा विद्यार्थ्यांनी दिनांक १५/१०/२०२५ पूर्वी उर्वरित शुल्क महाविद्यालयात जमा करणे अनिवार्य आहे. हिवाळी परीक्षा २०२५ चे हॉल तिकीट वितरित करण्यापूर्वी शुल्काची संपूर्ण रक्कम जमा केलेली असणे बंधनकारक आहे, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

विद्यार्थी व पालक यांना कोणतीही आर्थिक अडचण निर्माण होऊ नये, यासाठी ही पूर्वसूचना दिली जात आहे. वरील दोन्ही मुद्यांकडे संबंधित विद्यार्थ्यांनी तत्काळ व गांभीर्याने लक्ष द्यावे. निर्धारित मुदतीनंतर कोणतीही शिथिलता किंवा दिलासा दिला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

Zeal Polytechnic 0988 Narhe, Pune-41.

प्राचार्य
झील तंत्रनिकेतन,पुणे